**<u>जाब देणार यांच्या साक्षीदार क्र. 1 चा उलटतपास : तक्रारदारातर्फे श्री. ए. एन. सुरवसे वकील यांच्यामार्फत शपथेवर सुरू :</u>**

1. मी एसटी महामंडळाच्या अकोला विभागामध्ये 1995 पासून काम करत आहे. मी विभाग नियंत्रक मंडळ अकोला यांचे साक्ष देण्यासाठी परवानगीचे पत्र दाखल केलेले नाही. श्री. आर. बी. तुंबडे यांनी विभाग नियंत्रक यांच्याकडे अहवाल दिलेला आहे. साक्षीदारास उलटतपासामध्ये **<u>नि. यु–4</u>** वरील अ.क्र. 1 दि. 08/05/2013 रोजीचा रिपोर्टर यांचा अहवाल दाखवण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, दि. 08/05/2013 रोजीच्या अहवालावर माझी सही नाही. सदर अहवालास **<u>नि. यु–39</u>** देण्यात आले. हे म्हणणे खरे नाही की, बस ही श्री. तुंबडे यांनी एकटयाने तपासलेली होती. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळावर तक्रारदार यांच्या नोंदविलेल्या जबाबावर माझी सही नाही. हे म्हणणे खरे नाही की, 5 प्रवासी विनातिकीट आढळून आले त्यांनी वाहकाला तिकीटाचे पैसे दिलेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, तिकीट क्र. 4373 हे वाहकाने प्रवाशांना दिलेले नाही. तिकीट क्र. 4373 प्रवाशाकडून जप्त केल्याबाबत त्याचा जप्ती पंचनामा केलेला नाही. आमचे ईंचार्ज श्री. तुंबडे यांनी पहिल्यांदा 3 तिकीटे काढली व नंतर 2 तिकीटे काढली ईंचार्जच्या लक्षात न आल्यामुळे तिकीट काढलेली आहेत. हे म्हणणे खरे आहे की, 5 तिकीटे एका वेळेस काढता येऊ शकतात.

2. वाहकाने तिकीटावर अकोला ते संभाजीनगर 5 प्रवासी रू. 1325/– असे लिहून दिलेले होते. साक्षीदारास उलटतपासामध्ये नि. सी–5 वरील अ.क्र. 1 वरील पान क्र. 4 दाखवण्यात आले. वाहकाचा क्रमांक 7475 असा लिहलेला आहे. सदर क्रमांक वाहकाने लिहलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, वाहकाचा बॅच क्रमांक 7273 असा आहे. सदर ईस्पेक्शन रिपोर्टला **<u>नि. सी–23</u>** देण्यात येत आहे. मी वाहकाची तक्रार बयाण देत नाही त्यामुळे विभाग नियंत्रक औरंगाबाद यांच्याकडे केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळावर घेतलेल्या बयाणामध्ये अहवालकर्ते यांनी खाडाखोड केलेली होती व त्यावर तक्रारदार यांचा जबाब जबरदस्तीने करून घेतलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, तिकीट काढल्यानंतर रू. 19,888/– एवढी रक्कम मिळून आली व त्यामध्ये रू. 8/– किंमत कमी होती. हे म्हणणे खरे आहे की, रू. 8/–

कमी किंमत प्रवाशांना पैसे देण्याघेण्यामध्ये कमी राहू शकते. हे म्हणणे खरे आहे की, चौकशीमध्ये मला साक्षीदार म्हणून बोलावलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, रू. 1325/– चा अपहार वाहकाने केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, वाहकाने प्रवाशाने वाहकास अकोला येथे प्रवास भाडे रू. 1325/– घेवून त्यांना मशीन बंद आहे असे सांगून तिकीट क्र. 4373 अकोला ते सिडको औरंगाबाद दर रू. 1325/– असे लिहून दिले त्याबाबत जबाब वाहकाने दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी तपासणी स्कॉडमध्ये प्रत्यक्षपणे सहभागी नव्हतो त्यामुळे खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास : संपुर्ण.

फेरतपास : काही नाही.

**श्रवणोत्तर स्विकृत,**

LABOUR COURT MAHARASHTRA

Digitally signed by DATTATRAY SHANKARRAO KHEDEKAR
Date: 2026.03.04 11:59:12 +0530

**(द.शं.खेडेकर)**
न्यायाधीश,
कामगार न्यायालय क्र. 1 औरंगाबाद

दिनांक–25/02/2026